# येशू आपल्या प्रथम शिष्यांना पाचारण करतो

## येशूच्या मागे जाण्याने आनंद मिळतो हे मुलांना शिकवा.

मुलांचे वय आणि गरजा ह्यांना अनुरूप असे शिकविण्याचे कार्यक्रम निवडा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु, तुझ्या जीवनाविषयी शुभवर्तमानांमधून इतरांना सांगण्यास कृपा करून मुलांचे साहाय्य कर.''

येशू आपल्या शिष्यांना पाचारण करतो. हा वृत्तांत शिकविण्यासाठी तयारी करा. वाचा मत्तय 4:18-22 हा शास्त्रपाठ येशूने त्याचे सेवाकार्य आणि त्याची सुवार्ता पुढे नेण्यासाठी शिष्यांची निवड कशी केली ते सांगतो.

मोठ्या मुलाने वृत्तांत वाचावा किंवा सांगावा मग पुढील प्रश्न विचारा.(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तरे दिली आहेत.)

- येशूने बोलाविण्यापूर्वी पेत्र आणि आंद्रिया काय करीत होते? (वचन 18)
- येशूने ते त्याच्या मागे आल्यास काय करण्याचे अभिवचन दिले? (वचन 19)
- ते दोघेजण येशूच्या मागे कधी गेले? (वचन 20)
- आणखी कोण दोघेजण मासे धरणारे होते? (वचन 21)
- ते लगेचच येशूच्या मागे आले, तेव्हा मागे तारवात बोटीत कोणाला सोडून आले? (वचन 22)



पाठ करा मत्तय 10:2-4 मधील बारा शिष्यांची नावे नाट्यीकरण करा येशू आपल्या शिष्यांना पाचारण करतो.

मुलांनी ही नाटिका सादर करता यावी. यासाठी. उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.

- मोठ्या मुलांनी लहान मुलांची तयारी करून घेण्यास मदत करावी.
- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी करावयाच्या भूमिका येशू, शिमोन (पुढे यालाच पेत्र म्हणत) आंद्रिया आणि निवेदक वृत्तांताचा थोडक्यात सारांश करून मुलांकडून संवाद पाठ करून घेणे.
- लहान मुलांनी याकोब योहान, त्यांचे वडील जब्दी आणि इतर मासे धरणारे भूमिका करण्यात बोटी म्हणून उलटे स्टूल व जाळी म्हणून दोऱ्या वापरा.

**निवेदक:** वृत्तांत सांगून मग म्हणा, ''शिमोन आंद्रियाला काय म्हणतो ते ऐका.''

**शिमोन:** (बोटीजवळ बसून) ''आंद्रिया ते पाहिलेस का! लोकांना बरे करणारा तो नासरेथकर येशू बघ! त्याचे शिकविणे मला फार आवडते. बघ तो खूप चांगला आणि मोठा माणूस आहे तो कशाला आपल्याकडे लक्ष देईल.

**आंद्रिया:** ''तुझे बरोबर आहे शिमोन'' येशू इतका चांगला शिक्षक आहे की त्याला आपल्या मदतीची गरजच नाही.''

**येशू:** ''शिमोन आणि आंद्रिया! माझ्यामागे चला मला माणसे धरण्यासाठी मदत करा.''

**शिमोन व आंद्रिया:** उड्या मारा तुमची जाळी तिथेच टाकून येशूच्या मागे पळा.

**येशू:** ''योहान आणि याकोब!'' तुम्ही सुद्धा माझ्यामागे चला!''

**योहान व याकोब:** उड्या मारून येशूकडे पळा.

**जब्दी:** ''बघा ही पोर सगळी कामे आपल्या बापावर टाकून गेली! चला झाले ते चांगलेच म्हणायचे!''

**मासे धरणारे इतर:** नाटिका सुरू होईल तेव्हा जमीनीवर बसा. जब्दीने बोलायला सुरुवात केली की उभे राहा. योहान व याकोब ह्यांच्याकडे बोट दाखवून म्हणा, ''काय मूर्ख माणसे असतील ही!'' ''ते तर त्यांच्या बोटीही येथेच टाकून गेले!'' ''त्या गुरूजीच्या मागे जाण्यासाठी ह्यांनी चांगले काम सोडले!''

**निवेदक:** नाटिका संपल्यावर मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी प्रौढांना विचारावेत.

माशाचे चित्र काढा मुलांनाही ते काढायला सांगा.



- मोठ्या मुलांना कदाचित् बोटीचे चित्र काढायला आवडेल.



- मुलांनी उपासनेच्या वेळी आपआपली चित्रे मोठ्या माणसांना दाखवावीत आणि यावरून देव आम्हाला माणसे धरण्याचे नवे काम कसे देतो हे पहायला मिळते असे सांगा.

येशूच्या मागे जाण्यास लोकांना मदत करण्यामधून विश्वासणारे कशा प्रकारे माणसे धरणारे होतात याबद्दलची आणखी इतर उदाहरणे मुलांना विचारा.

**कविता** पाच मुलांना रोम 8:35-39 ह्यातून प्रत्येकी एक वचन म्हणण्यास सांगा.

मोठ्या मुलांनी वृत्तांतामधील येशूचे शब्द वापरून कविता वा गीत लिहावे.

**पाठ करा** योहान 15:16

**प्रार्थना:** ''प्रिय देवबापा, तुझे शिष्य होण्यासाठी तू आमची निवड केल्याबद्दल धन्यवाद, तुझे आज्ञापालन करण्याची आणि तू सांगितल्याप्रमाणे करून फळ देण्याची आमची इच्छा आहे. तुझ्या हाकेला आम्ही लगेचच ओ द्यावी आणि माणसे धरणारे व्हावे यासाठी आमचे साहाय्य कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net